सायं.दैनिक

# विश्वनायक

Email : vishvanayak94@gmail.com

• संपादक : बिलाल शेख •

Mo-9422404740



बीड : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करताना डॉ.क्षीरसागर यांच्यासह डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर आणि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ | अंक – ८५ | गुरूवार, दि.०३एप्रिल २०२५ | आरएनआय –एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 | Issue - 85 | Thursday, Dt.03 April 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4

# हे कसले लोकप्रतिनिधी मोठमोठ्या गुन्ह्याला म्हणतात किरकोळ प्रकरण!

## आमदार सुरेश धस यांची वेगवेगळ्या प्रकरणात दुटप्पी भूमिका

विश्वनायक न्यूज

गेवराई तालुक्यातील अर्धा मसला येथे जिलेटिनचा स्फोट घडून प्रार्थना स्थळ उडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्या घटनेला आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी ही किरकोळ घटना असल्याची प्रतिक्रिया दिल्याने त्याच्या विरोधात संताप व्यक्त केला जात आहे. एखाद्या गंभीर घटनेला आमदार किरकोळ घटना म्हणत असतील तर हे कसले लोकप्रतिनिधी असा सवाल विचारला जाऊ लागला असून, आमदार धस यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त होत आहे. यापूर्वीच्या काही प्रकरणात आमदार धस यांनी अशीच दुटप्पी भूमिका घेतल्याचे समोर आले आहे. एकीकडे आपण खूप चांगले असून, अन्यायाविरोधात लढत असल्याचे दाखवायचे आणि दुसरीकडे अडचण वाटली की आपल्या सोयीची भूमिका घ्यायची, अशी दुहेरी पद्धत आमदार धस यांच्यात दिसून आली आहे. त्यांच्या या प्रवृत्तीचा सध्या सर्वत्र निषेध होत असून, मुस्लिम समाजामध्ये प्रचंड रोष पसरलेला आहे.

आष्टी पाटोदा शिरूर तालुक्याचे आमदार सुरेश धस हे केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणानंतर एकदम प्रसिद्धीत आले. संतोष देशमुख यांचा अत्यंत निर्दयी खून झाल्याचे वर्णन त्यांनी नागपूरच्या अधिवेशनात सभागृहातच केले. आपण न्यायाची भूमिका घेत आहोत असे सांगत त्यांनी शेवटपर्यंत देशमुख कुटुंबांच्या पाठीमागे उभे राहणार असल्याचे बोलून दाखवले. आमदार धस यांच्या या भूमिकेचे संपूर्ण महाराष्ट्रातून कौतुक झाले. पुढे त्यांनी बीड, परळीतील अनेक प्रकरणे उघडकीस आणली. भ्रष्टाचारही चव्हाट्यावर आणला. त्यामुळे स्पष्ट बोलणारा आणि अन्यायाविरोधात लढणारा आमदार अशी ओळख सुरेश धस यांची झाली. मात्र थोड्याच दिवसात त्यांच्या या प्रतिमेला तडे गेले. संतोष देशमुख यांचा खून झाला त्याच सुमारास परभणी येथे संविधानाचा अवमान झाल्यानंतर जो हिंसाचार झाला आणि त्यातून पोलिसांनी मारहाण केल्यामुळे सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला. यामध्ये पोलीसच मारेकरी असून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी होऊ लागली. सुरुवातीला सुरेश धस यांनी सुद्धा तशी मागणी केली. परभणीत जाऊन कुटुंबाची भेटही घेतली मात्र थोड्याच दिवसात आपली भूमिका त्यांनी बदलली. ज्या पोलिसांमुळे सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला त्या पोलिसांना माफ करून टाका असे शब्द सुरेश धस यांनी काढले. झाले गेले सोडून द्या, पोलिसांना अधिकाऱ्यांनी झापले आहे त्यामुळे त्यांना माफ करा असे म्हटले. म्हणजे एकीकडे संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या म्हणायचे आणि दुसरीकडे सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना माफ करा म्हणायचे अशी दुटप्पी भूमिका सुरेश धस यांनी घेतली. त्याही वेळी त्यांच्यावर टीका करण्यात आली. थोड्याच दिवसांमध्ये त्यांचा कार्यकर्ता असलेला भोसले उर्फ खोक्या याचे मारहाणीचे प्रकरण बाहेर आले. याशिवाय खोक्याने जे कारणामे केले ते सगळे बाहेर आले आणि सोबतच काही व्हिडिओ व्हायरल झाले. नोटा उधळताना, अंगावर सोने घालून फिरतानाचा व्हिडिओ बाहेर आला. आलिशान गाडी, आलिशान घर समोर आले. खोक्याच्या प्रकरणावरून सुरेश धस यांना टार्गेटही करण्यात आले. त्यांनी सुरुवातीला खोक्यावर गुन्हा दाखल करा अशी भूमिका घेतली मात्र आता ते म्हणाले की खोक्या हा गरीब असून, तो सोन्याचे नाही तर बेन्टेक्स चे दागिने वापरतो. त्याच्याकडे आलेला पैसा हा मुथूट फायनान्सचा होता. तू जेवढा मोठा केला तेवढा मोठा नाही. मात्र जो आलिशान गाडीमध्ये फिरतो, हेलिकॉप्टर मध्येही फिरल्याचा व्हिडिओ आहे, तो खोटा आहे का? मुथूट फायनान्सने एवढे मोठे लोन देण्यामागचे कारण काय ? आणि त्या खोक्याची त्या परिसरात असलेली दहशत, त्याने केलेली मारहाण दुर्लक्षित करण्यासारखी आहे का ? असे प्रश्न उभे ठाकले असून, याही प्रकरणात सुरेश धस यांनी घेतलेली दुहेरी भूमिका समोर आली आहे. पाच दिवसांपूर्वी गेवराई तालुक्यातील अर्धा मसला येथे प्रार्थना स्थळात जिलेटिनचा स्फोट घडवून आणण्यात आला. या गंभीर प्रकरणाला सुरेश धस यांनी किरकोळ प्रकरण असल्याचे सांगत दुर्लक्ष करा असे म्हटले. आरोपींनी एक प्रार्थना स्थळ तेही सणासुदीच्या दिवसात उडवून देण्याचा प्रयत्न केला. ते प्रकरण सुरेश धस यांना कोणत्या अँगलने किरकोळ वाटते ?



### स्वत:चं ठेवायचं झाकून अन दुसऱ्याचं बघायचं वाकून

आमदार सुरेश धस हे नेहमीच दुसऱ्याची प्रकरणे बाहेर काढायला पुढे येतात. मात्र स्वत:च्या बाबतीत काही समोर आले की ते झाकण्याचा प्रयत्न करतात. बीड जिल्ह्यातील आणि राज्यातील जनता दूधखुळी नाही, कोणाचे नेचर कसे आणि कोणत्या मतदारसंघात काय सुरू आहे हे सगळे त्यांना ठाऊक असते. मात्र शिरजोरपणा करून आपल्या भूमिकेचे कोणी समर्थन करीत असेल तर ते खरेच असते असे नाही. दुसऱ्यांचे उनेदूने काढण्यासाठी पुढे असलेले सुरेश धस स्वत:चे मात्र झाकून ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न करतात.

**एखाद्या व्यक्तीला मारहाण झाली किंवा घरावर हल्ला झालातर ते सुद्धा आपण समजून घेऊ शकतो, मात्र येथे प्रार्थना स्थळ उडून देण्याचा प्रयत्न झाला, जो अस्थेचा विषय आहे. आणि त्याला सुरेश धस हे किरकोळ म्हणत असतील तर ते खरेच लोकप्रतिनिधी आहेत का? असा प्रश्न पडतो.**

### समाजाच्या तीव्र भावना

### समाजाची बाजू घेताना तोल जातोय का ?

आमदार सुरेश धस यांच्यावर आता जातीविषयक भूमिका घेत असल्याचा आरोप होत आहे. परभणीच्या प्रकरणांमध्ये ज्या सूर्यवंशी यांचा मारहाणीत मृत्यू झाला ते मारहाण करणारे पोलीस हे मराठा समाजाचे असल्याचे सांगण्यात येते. चौकशीनंतर पोलिसांच्या मारहाणीतच मृत्यू झाला असे समोर आले आहे. मात्र सुरेश धस हे अशा दोषी पोलिसांना माफ करा अशा भूमिकेत होते. मोठ्या मनाने त्यांना सोडून द्या असे ते म्हणाले. अर्धमसला येथे झालेल्या प्रार्थना स्थळाच्या स्फोट प्रकरणांमध्येही मराठा समाजाचे तरुण आहेत. त्यामुळेच एवढ्या गंभीर प्रकरणाला सुरेश धस हे किरकोळ प्रकरण असल्याचे सांगत आहेत. म्हणूनच समाजाची बाजू घेताना सुरेश धस यांचा तोल जात आहे का ? असा सवाल विचारला जाऊ लागला आहे.

### धस साहेब, किरकोळ प्रकरण म्हणून उगाच अक्कल पाजाळू नका : समाजाच्या तीव्र भावना

प्रार्थना स्थळ हा श्रद्धेचा आणि अस्थ्येचा विषय असतो. कोणत्याही परिस्थितीत त्याचे नुकसान सहन होणारे नसते. जिलेटिन सारख्या अत्यंत घातक स्फोटकाने हे प्रार्थना स्थळ उडवून देण्याचा प्रयत्न झाला. यातून नुकसान जरी कमी झाले असले तरी ज्यांनी हे घडवून आणले त्यांचा उद्देश लक्षात येतो. एवढे मोठे गंभीर प्रकरण असताना याला सुरेश धस यांनी स्वतःची अक्कल पाजाळून किरकोळ प्रकरण म्हणून नये, अशा अत्यंत संतप्त भावना मुस्लिम समाजातून उमटत आहेत. जर तुमच्या बाबतीत असे काही घडले आणि ते लोक नशेमध्ये असतील तर तुम्ही त्याकडे किरकोळ प्रकरण म्हणून ते सोडून देताल का ? असा सवाल समाजाकडून धस यांना विचारला जात आहे. त्यामुळे समाजाच्या भावनेशी न खेळता प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घ्या, असा सल्लाही सुरेश धस यांना दिला जात आहे.

# महसूल विभागाचा आगळावेगळा उपक्रम : जिवंत सातबारा मोहिम

महसूल व वनविभाग , महाराष्ट्र शासनामार्फत सातत्याने शेतकऱ्यांच्या हितासाठी व कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना राबवण्यात येत असतात . त्यापैकीच एक म्हणजे ' जिवंत सातबारा मोहिम ' . महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार ही मोहीम संपूर्ण राज्यामध्ये राबवण्याचा उपक्रम सध्या सुरु आहे . बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण बीड तालुक्यात ही जिवंत सातबारा मोहीम राबवण्यात येत आहे . या योजनेअंतर्गत सातबारा वरील सर्व मयत खातेदारांच्या नोंदीचे कामकाज पूर्ण करण्यासाठी बीड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात जिवंत सातबारा मोहीम राबविली जात आहे .

कृती आराखडा :- महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासनातर्फे १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे . त्या अंतर्गत दिनांक १ एप्रिल २०२५ ते ५ एप्रिल २०२५ पर्यंत ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) यांनी त्यांच्या सज्जा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये चावडी वाचन करून ( न्यायप्रविष्ठ प्रकरणे सोडून ) गाव निहाय मयत खातेदार यांची यादी तयार करून घ्यावयाची आहे . सध्या जिल्हाभरात ग्राम महसूल अधिकारी यासाठी फिरत आहेत .

त्यानंतर दिनांक ६ एप्रिल २०२५ ते दिनांक २० एप्रिल २०२५ पर्यंत मयत खातेदारांच्या वारसांनी वारसा संबंधित आवश्यक कागदपत्रे ( मृत्यू दाखला , वारसाबाबत सत्यप्रतिज्ञालेख , स्वयंघोषणापत्र /पोलीसपाटील / सरपंच / ग्रामसेवक यांचा दाखला , सर्व वारसांचे नावे , वय , पत्ते व मोबाईल नंबर तसेच रहिवासी बाबतचा पुरावा ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) यांच्याकडे सादर करावयाचे आहेत . ग्राम महसूल अधिकारी योग्य ती चौकशी करून मंडळ अधिकाऱ्यांमार्फत वारस ठराव करण्यात येईल . त्यानंतर दिनांक २१ एप्रिल २०२५ ते १० मे २०२५ पर्यंत ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) यांच्याकडून ई फेरफार प्रणालीमध्ये ऑनलाईन वारस फेरफार तयार करून महसूल अधिनियम १९६६ च्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून मंडळ अधिकारी यांच्या मार्फत वारस फेरफारावर निर्णय घेऊन त्यानुसार सातबारा दुरुस्त करण्यात येईल . जेणेकरून सर्व जिवंत व्यक्ती सातबारावर नोंदविल्या जातील .



सातबारा उताऱ्यावर मयत शेतकऱ्यांचे नाव असल्यामुळे अनुदानाची केवायसी करणे व इतर कामांमध्ये अडचण येताना दिसत होती . या मोहिमेमुळे प्रत्येक वारसदारांना शासनामार्फत मिळणाऱ्या प्रत्येक योजनेचा लाभ मिळणे सोपे होणार आहे . त्याकरिता महसूल प्रशासन नेहमीच सज्ज आहे . येणाऱ्या काही दिवसात आपला सातबारा जिवंत होईल हे नक्कीच !बीड तालुक्यामध्ये एकूण २३६ गावे , १६ मंडळे , ८८ सज्जे असे एकूण १२०६९० शेतकरी खातेदार आहेत . यातील मयत खातेदार यांची यादी बनवून सर्वांपर्यंत या योजनेची माहिती पोहोचवण्यासाठी बीड तालुक्याचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी धडाडीने प्रयत्न सुरु केले आहेत . गावोगावी जाऊन प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत योजनेची माहिती देण्यासाठी सर्व नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी यांचे प्रयत्न सुरु असणार आहेत . ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) यांनी १ एप्रिल पासूनच ८ अ उताऱ्याचे चावडी वाचन सुरु केलेले आहे .

जिवंत सातबारा मोहिमेसाठी शासनाने तहसीलदार यांची त्यांच्या तालुक्यासाठी समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे . तर संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्ह्याचे नियंत्रण अधिकारी म्हणून निवड केलेली आहे . याशिवाय संबंधित विभागीय आयुक्त त्यांच्या अधिनस्त जिल्ह्यांसाठी विभागीय संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत . आयुक्त जिल्ह्यांचा नियमित आढावा घेऊन त्याबाबतचा साप्ताहिक अहवाल शासनाला सादर करणार आहेत .

जिवंत सातबारा ही मोहीम सर्व शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त अशी मोहीम आहे . त्यामुळे मयतांची नावे सातबारा वरून कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी सुद्धा प्रतिसाद द्यावा , असे आवाहन बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे .

# शेख निजामच्या मागे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पूर्णपणे ताकतीशी पाठीशी राहील– उपमुख्यमंत्री अजित दादा पवार

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील व शहरातील प्रगल्भ आणि अचूक राजकीय निर्णय घेण्याची क्षमता असलेल्या शेख निजाम यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधण्याचा निर्णय घेतला व त्यानिमित्ताने शेख निजाम यांचा पक्षप्रवेश व रमजान ईद निमित्त ईद-ए-मिलाप या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या पक्षप्रवेश व ईद-ए-मिलाप च्या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य श्री अजित दादा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी प्रस्ताविक पर भाषणामध्ये शेख निजाम यांनी बीड शहरातील महत्त्वपूर्ण असलेल्या नवीन ईदगाह बालेपिर येथे सिमेंट काँक्रेट रस्ता व काँक्रिटीकरण, अल्पसंख्याक समाजातील मुलींकरिता मंजूर असलेले वस्तीग्रह च काम सुरू करणे, बीड जिल्ह्यात उर्दू घराची स्थापना करणे, इतर जिल्ह्याप्रमाणे बीड जिल्ह्यातील यूपीएसस एमपीएससीची तयारी करणाऱ्या अल्पसंख्यांक मुला मुलीं करिता स्टडी सेंटर व लायब्ररी स्थापित करणे, इस्लामपुरा ईदगाह येथे जागा अपुरी पडत असल्यामुळे बिंदुसरा नदी पात्रातील जागा उपलब्ध करून देणे, अल्पसंख्यांक बहुल भागात नियोजनबद्ध आराखडा तयार करून सदरील भागांचा नियोजनबद्ध विकास करणे आधी मागण्या उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या कडे केल्या या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शेख निजाम हे महत्त्वकांक्षी





व्यक्तिमत्व असून त्यांनी केलेल्या मागण्या चा सकारात्मक विचार करून त्या पूर्ण करण्यात येतील त्याचा पाठपुरावा शेख निजाम यांनी करावा व या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन दिले व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याबद्दल एक निजाम व सहकार चे अभिनंदन करीत शेख निजाम सारख्या कार्यकर्त्यांची पक्षाला गरज असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शेख निजाम यांच्या पाठीशी पूर्णपणे ताकतीशी उभी राहील असे म्हटले सदरील कार्यक्रमास मा आ. प्रकाश दादा सोळंके, मा. आ. अमरसिंह जी पंडित, आ. विजयसिंह पंडित, आ. सतीश जी चव्हाण, आ. विक्रम काळे, माजी आ. संजय दौंड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण अँड गोरक्ष लोखंडे, राष्ट्रवादी ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, योगेश क्षीरसागर, नारायण बप्पा शिंदे बळीराम गवते, बळी चव्हाण, प्रशिक्षित जाधव, अनुप मंत्री, संदीप पाटील, रितेश ढगे पाटील गोपाल धांडे, विजय चांदणे, सलीम शेख, समीर सय्यद, रईस चाऊस, सरपंच बिलाल पटेल, प्रज्ञाताई खोसरे, प्रियाताई डोईफोडे, शितलताई धोंडरे,लोकपत्रकार भागवत तावरे, अब्दुल वकील सर अस्लम अनवरी सर, नगरसेवक जैतुला खान, शेख इकबाल, रवीद्र कदम विनोद मुळूक, विलास विधाते, रमेश चव्हाण, सय्यद इलियास मुन्ना, इनामदार, रफिक नाशाद,यांच्या सह बीड शहरातील अनेक नगरसेवक मान्यवर व्यक्ती राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी सर्वसामान्य नागरिक व महिला वर्ग मोठ्या प्रमाणात आदी उपस्थित होते

प्रवेश झालेल्या लोकांची नावे

शेख निजाम जैनुद्दीन ,शेख अमर जैनुद्दीन, मोमीन जुबेर ,खय्युम इनामदार, पठाण चुन्नू खान, जयंत वाघ ,आजम खान, जब्बार इनामदार ,मुजफ्फर चौधरी ,शेख, नसीर, हाजी अयुब खान पठाण ,शेख हमीद पीर मोहम्मद ,सय्यद फहीम, शेख इमरान शेख अदनान जमीर इनामदार सय्यद रियाज राजे व इतर

# बीडच्या उर्दू घरासह, वॉकिंग ट्रॅक, अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न तातडीने मार्गी लावू - अजितदादा पवार

## फारूक पटेल यांच्या ईद मिलापमधून अजितदादांकडून विकासाचा शब्द

### नफरत को मिटाकर देखों, दिलों को जोडकर देखों, सुकून मिलता है बस मोहब्बत को अपनाकर देखों - अजितदादा

बीड (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील अर्धमसला प्रकरणात पालकमंत्री या नात्याने तातडीने संबंधीत अधिकार्यांना संपर्क करून दोषींवर कठोर कारवाईच्या सुचना दिलेल्या आहेत. आपण काळजी करू नका, जे दोषी आहेत त्यांच्यावर नक्कीच कडक कारवाई करण्यात येईल असे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी सांगितले. फारूख पटेल यांनी विकासाचे जे मुद्दे मांडले आहेत या विषयी अधिकाऱ्यांच्या बैठकीत माहिती घेऊन त्या संबंधी योग्य निर्णय घेतला जाईल. बीड शहरातील १७ रस्त्यांच्या कामासह इतरही प्रश्न मार्गी लावू आणि विकासासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन दिला जाईल असा शब्द अजितदादांनी फारूक पटेल आणि उपस्थित मुस्लिम समाजाला दिला.

बीड येथे राष्ट्रवादीचे नेते फारूख पटेल यांनी आयोजीत केलेल्या ईद मिलाप कार्यक्रम प्रसंगी अजितदादा बोलत होते.यावेळी व्यासपीठावर आ.प्रकाशदादा सोळंके, आ.विक्रम काळे, माजी आ.अमरसिंह पंडित, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष सलीम सारंग, मोहन चौधरी, ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, सुरज चव्हाण,

नगरसेवक अमर नाईकवाडे, मोईन मास्टर, डॉ. योगेश क्षीरसागर, अश्फाक इनामदार,अविनाश नाईकवाडे, बरकत पठाण, शफीक हाश्मी, मौलाना जाकेर, मौलाना बाकी, अलीम पटेल, शकील खान आदिंची उपस्थिती होती. अजितदादा म्हणाले की, बीड जिल्ह्याला शांती आणि विकासाच्या नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी सर्वांच्या योगदानाची गरज आहे. प्रेम आणि भाईचारा कायम राखावा. भडकाऊ वक्तव्य आणि अफवांपासून सावध रहावे असे आवाहन त्यांनी केले. नफरत को मिटाकर देखों, दिलों को जोडकर देखों सुकून मिलता है बोहोत, बस मोहब्बत को




अपनाकर देखों असे म्हणत त्यांनी जिल्ह्याच्या विकासात सर्वांनी एकत्र येऊन योगदान देण्याचे आवाहन केले.फारूख पटेल यांनी विकासाचे मुद्दे मांडले, त्यात वॉकिंग ट्रॅक, रोड यासह इतर मुद्यांचा समावेश असुन या संदर्भात

#### पटेल यांनी कुरआन तर अमरनानांनी श्रीमद् भगवत गीता देऊन केले दादांचे स्वागत

बीड नगर परिषदेचे गटनेते फारुख पटेल यांनी आयोजित केलेल्या ईद मिलाप कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. नगरसेवक अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक म्हणून आज आदरणीय अजितदादांचा श्रीमद् भगवद्गीता व कुरान शरीफ हे दोन पवित्र ग्रंथ देऊन स्वागत केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पटेल आणि अमर नाईकवाडे या जोडीने हिंदू - मुस्लिम एकतेचे दर्शन घडवले.

पालकमंत्री या नात्याने जास्तीत जास्त निधी कसा देता येईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे अजितदादांनी सांगितले. रमजान ईदच्या अनुषंगाने अजितदादांनी सर्व मुस्लिम समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी फारूक पटेल म्हणाले, दरवर्षी ईद मिलाप कार्यक्रम घेतला जातो मात्र यावर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजितदादा यांनी उपस्थित राहून चार चांद लावले आहेत. ईदसाठी मोठे ज्यावेळी घरी येतात त्यावेळी लहानांना ईदी देतात असे म्हणत पटेल यांनी बीड शहराच्या विकासाच्या अनुषंगाने काही मागण्या दादांपुढे मांडल्या. अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न २००६पासून प्रलंबित आहे त्यामुळे प्राधान्याने हा प्रश्न मार्गी लावावा, अल्पसंख्याक बहुल भागात विकास कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, खासबाग मैदानावर वॉकिंग ट्रॅक आणि त्याचा विकास करावा, बीडमध्ये उर्दू घराची निर्मिती करावी, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, बीड शहरातील पाणी पुरवठ्याचा थकीत वीजबिल प्रश्न , राजुरी वेस ते चांदणी चौक, राजुरी वेस ते माळीवेस, राष्ट्रवादी भवन ते स्मशान भूमी अशा १७ रस्त्यांच्या कामाचा प्रस्ताव आहे त्यास निधीसह मंजुरी द्यावी आणि अतिक्रमण हटवण्यात आलेल्या १४ घरांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा अशा आग्रही मागण्या फारूक पटेल यांनी अजितदादा पुढे मांडल्या.

# रामायनाचे चिकित्सक अभ्यासक, आपल्या वेगळ्या

## शैलीने रामाला घराघरातआणि माणूस माणसाशी जोडणारं व्यक्तिमत्व म्हणजे-ड्रॉ जलाल महाराज सय्यद

आपल्या गावात गेल्या तीन दिवसापासून राम नगर माकोडे गल्ली येते राम नवमी निमित्त भव्य दिव्य राम कथे चे आयोजन करण्यात आले आहे.मुस्लिम कीर्तनकार तो ही रामा ची कथा सांगत आहे याबद्दल मोठं कुतूहल वाटले. महाकाव्य रामायण चे गाढे अभ्यासक असलेले विदवान नामवंत कीर्तनकार आहेत. त्याचा विठ्ठला चे निस्सीम भक्त असणाऱ्या कुटूंबातील ते तिसऱ्या पिढी तील कीर्तनकार आहेत. त्याचे जन्म गाव नासिक जिल्ह्यात निफाड जवळ असलेले करंजी खुर्द हे गाव आहे. ते गोदावरी नदी च्या काठावर वसले आहे. महाराज २०१०पासून वारकरी संप्रदाय ची विचारधारा आपल्या राज्याबरोबर गुजरात, मध्यप्रदेश, तेलगाणा, कर्नाटक अशा वेगवेगळया राज्यात पोहचविण्याचे कार्य करत आहेत. सामाजिक परिस्थिती प्रतिकूल असून देखील वारकरी संप्रदाय ला आणि विचारधारेला अवघ आयुष्य समर्पित केलं आहे. कीर्तन आणि उत्कृष्ट कथाकार बरोबर त्यांचे गायनातील



कौशल्य अवीट आणि वाखान्यजोग आहे ते आपण आपल्या गावात अनुभवत आहोत.

गेल्या तीन दिवसापासून आपल्या रामायण कथे चा दाखला घेत भक्ती बरोबर प्रबोधन करत आहेत. त्यांनी रामायण म्हणजे एक कुटुंब व्यवस्था आहे. रामायना मधून सुद्धा राजकारण समाजकारण साधता येते त्यासाठी प्रत्येकाने माणसाविषयीं बोलाण्या पेक्षा माणसाला बोलले पाहिजे असं ते ठणकावून सांगतात त्याचबरोबर समाजात जीवन जगत असताना एक मेकांविषयी बदला घेण्याची भावना ठेवण्यापेक्षा स्वतः बदल केला तर जग आपोआप बदल घडवील असा कथेतून मोलाचा संदेश देतात. त्यांची कथा ऐकताना दररोज वेगळी अनुभूती येत आहे. तेव्हा गावातील प्रत्येकाने या अनुभूती चे साक्षी दार झालं पाहिजे

# आष्टी येथे विश्रामग्रह ते तहसिल कार्यालय धडकनार मोर्चा

आष्टी ।प्रतिनिधी

बूद्धगया येथील बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे व बौद्ध युवक विकास बनसोडे यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी या मागणीसाठी शुक्रवार दिनांक ०४ एप्रिल रोजी होणाऱ्या भव्यदिव्य मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आष्टी तालुक्यातील समस्त भीमसैनिकांच्या वतीने करण्यात आले आहे.

बुद्धगया येथील महाबुद्धविहार हे फक्त बौद्धांच्याच ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी राज्यातच नाही तर देशभर आंदोलने सुरू आहेत. अनेक वर्षाची ही मागणी असून आता या मागणीने उद्रेक स्वरुप निर्माण केले आहे.अनेक ठिकाणी आंबेडकरी चळवळीतील नेत्यांनी लक्ष घालुन मागणी लावून धरली आहे.त्याचअनुषंगाने आष्टी तालुक्यातील समस्त भीमसैनिकांच्या वतीने देखील या मागणीचा आवाज बुलंद करण्यासाठी रस्त्यावर उतरणार आहेत.

तसेच काही दिवसांपूर्वी विकास



बनसोडे यांची देखील जातीय द्वेषातुन हत्या झाली असून त्या हत्येतील आरोपींना कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी देखील शुक्रवार दिनांक ०४ एप्रिल रोजी सकाळी साडेअकरा वाजता मोर्चाचे आयोजन केले असून आष्टी तालुक्यातील समस्त आंबेडकरी प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

आज उपविभागीय पोलिस अधिकारी साहेब यांना त्या संदर्भात निवेदन देखील देण्यात आले आहे.यावेळी संदिप जाधव, कुणाल निकाळजे, दिपक गरुड,सुभाष निकाळजे,राहुल निकाळजे,संजय खंडागळे, नितीन निकाळजे, अविनाश भा. निकाळजे,दिपक वाल्हेकर, समीर शिरसाट, अविनाश निकाळजे,मुकेश निकाळजे,आदी सर्व भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सार्वजनिक बांधकाम विभागातील शेख शफीभाऊ यांचा लिंबागणेश ग्रामपंचायत मार्फत सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ



लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेशचे भुमिपुत्र शेख शफीभाऊ शेख अब्दुल हे नियत वयोमानानुसार पाटोदा सार्वजनिक बांधकाम विभाग येथुन निवृत्त झाले असुन आज दि.०३ गुरुवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायतीच्या वतीने शाल , श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते.कार्यक्रमाची प्रस्तावना व सुत्रसंचलन भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले. शेख शफीभाऊ यांचे वर्गमित्र निवृत्त अभियंता गणपत तागड यांनी तसेच पत्रकार हरीओम क्षीरसागर,माजी सरपंच बाळासाहेब मुळे, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, रमेश गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ.गणेश ढवळे यांनी शेख शफीभाऊ यांनी केलेल्या सेवेचा व त्यांच्या कार्याचा गुणगौरव करीत असताना त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरचा काळ सुखी, समृद्धी, आनंदाने जावो व त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो यासाठी शुभेच्छा दिल्या.सत्कारमूर्ती शेख शफीभाऊ यांनी सत्काराला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील भोकरदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग याठिकाणी २६ वर्षे सेवा केल्यानंतर १५ वर्षे बीड जिल्ह्यातील पाटोदा याठिकाणी ३१ मार्च रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाल्याचे सांगताना शासकीय नोकरी करत असताना गावच्या मातीची ओढ , त्यांना आलेले अनुभव कथन केले. ग्रामपंचायत मार्फत करण्यात आलेल्या सत्कार समारंभाबद्दल सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांचे आभार मानले. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी माजी सरपंच राजेभाऊ गिरे, संदिप मंडलिक, बाळकृष्ण थोरात,ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ , दामोदर थोरात, महादेव कुदळे, अशोक जाधव, अँड . गणेश वाणी,संतोष भोसले, अशोक वाणी,दादा गायकवाड, शेख खाजु,सय्यद रफिक,शेख अकबर मिस्त्री, आरूण ढवळे, राजेंद्र ढास ,अमोल जाधव ,राजेभाऊ आगवान आदि ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# चौसाळा येथिल हजरत चंदन शहावली यात्रेस मोठया संख्येने उपस्थित रहा - कुचेकर -कळासे



बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पावसाळा येथील हिंदू मुस्लिम एक्याचे प्रतिक असलेल्या हजरत चंदन शहावली बाबा या देवस्थान यात्रेस प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी मोठया उत्साहात दिनांक ०३ /०४/२०२५ रोजी पासुन प्रारंभ होत असुन यात्रेनिमित्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी चौसाळा व पंचक्रोशीतील जनतेने मोठया संख्येने उपस्थीत रहावे असे आवाहन हजरत चंदन शहावली यात्रा कमिटी अध्यक्ष अंकुश कळासे व उपाध्यक्ष पवन कुचेकर यांनी केले आहे.

दिनांक ०३/०४/२०२५ रोजी संदल निमित्त रात्री ब्रास बँडचा मुकाबला होणार आहे दिनांक ०४/०४/२०२५ सांस्कृतिक कार्यक्रम व संध्याकाळी नऊ वाजता शोभेची दारूचा कार्यक्रम होणार आहे तसेच दिनांक०४/०४/२०२५ रोजी ०९ ते१२ साई स्किन हॉस्पिटल तर्फे मोफत त्वचारोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक ०५/०४/२०२५ रोजी दुपारी०२ ते०६ कुस्त्यांची दंगल व शेवटची कुस्ती ११११११ होणार आहे तसेच बुधवार दिनांक०९/०४/२०२५ रोजी ह. भ. प. शिवलीला ताई पाटील यांचे हरिकीर्तन होणार आहे तरी चौसाळा व पंचक्रोशीतील जनतेने या भरघोस कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन हजरत चंदन शहावली यात्रा कमिटी अध्यक्ष अंकुश कळासे व उपाध्यक्ष पवन कुचेकर यांच्यासह सर्व कमिटी व चौसाळाकार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



# अंबाजोगाई परिसरातील मिनिबँक म्हणून ओळखल्या जाणारी

## श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेस मार्च २०२५ अखेर ८५.२१ लाखाचा नफा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

ग्राहक हेच दैवत तसेच सर्वांना आपलं माननारी शहरवासीयांची मिनी बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेस मार्च २०२५ अखेर रुपये ८५.२१ लक्ष एवढा निव्वळ नफा मिळाला आहे. ग्राहकांच्या दृढ विश्वासाने ५२ कोटीच्या ठेवी मिळवत श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेस मार्च २०२५ अखेर ८५.२१ लक्ष रुपयांचा नफा मिळवला असल्याची माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष माणिक वडवणकर, उपाध्यक्ष मनोज लखेरा आणि व्यवस्थापक गजानन कुलकर्णी यांनी दिली आहे. पतसंस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी यांचे बहुमूल्य आणि नियोजनबध्द व अभ्यासु मार्गदर्शन यांच्या बळावरच आज पतसंस्थेची यशस्वी घोडदौड सुरू असल्याची माहिती जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेची मार्च २०२५ अखेरची वित्तीय स्थिती पुढीलप्रमाणे मांडली आहे. त्यामध्ये पतसंस्थेकडे एकूण २२५१ एवढे सभासद असून, पतसंस्थेचे एकूण भाग भांडवल रुपये ३ कोटी एवढे आहे . पतसंस्थेचा स्वनिधीं हा रुपये ६.३५ कोटी एवढा असून पतसंस्थेकडे सभासदांच्या तसेच ग्राहकांच्या एकूण ठेवी रुपये ५२ कोटी एवढ्या आहेत. तर सभासद व ग्राहकांना मार्च २०२५ अखेर पर्यंत कर्ज वाटप रुपये ४५ कोटी एवढे करण्यात आले असून पतसंस्थेची अंबाजोगाई पिपल्स बँक व अन्य ठिकाणची गुंतवणूक ही रुपये २५ .४८ कोटी एवढी असून ३१ मार्च २०२५ अखेर(आर्थिक वर्ष २०२४- २०२५) पतसंस्थेस रुपये ८५.२१ लक्ष रुपयांचा निव्वळ नफा झाला असल्याची माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष माणिक वडवनकर यांनी दिली आहे. श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था ही साधारणपणे पस्तीस वर्षापूर्वी एका छोट्याश्या खोलीत केवळ १० हजार रुपयांच्या गुंतवणुकीवर चालू करण्यात आली होती . पतसंस्थेच्या काटेकोर नियोजन , संस्थापक राजकिशोर मोदी यांचे मार्गदर्शन त्याचबरोबर सभासद , ठेवीदार व ग्राहकांच्या अतूट विश्वासाच्या बळावर श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेने रुपये दहा हजारावरून आज ५२ कोटीचा टप्पा गाठला आहे .

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com